**प्रशासकिय इमारत जिल्हा परिषद,वाशिम**
**आयएसओ ९००१:२००८ आयएसओ मानांकित कार्यालय,जिल्हाधिकारी कार्यालयासमोर,काटा रोड,वाशिम ४४४५०५**
**दुरध्वनी क्रमांक : ०७२५२-२३२८६२** **इमेल : dyceozpwashim@gmail.com**

जा.क्र./जिपवा/साप्रवि/नियोजन/१७६९/२०१८
कार्यालय जिल्हा परिषद,वाशिम
दिनांक : १०/०४/२०१८

**आदेश,**

पंचायत समिती / ग्रामपंचायत मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे सनियंत्रण होणे आवश्यक असून त्यानुसार योजनांची अंमलबजावणी १०० % होणेकरिता विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांचेमध्ये समन्वय आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना तालुका व ग्रामपंचायत स्तरावर प्रभावीपणे राबविण्याकरिता जिल्हा परिषदमार्फत नियोजन करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने यासोबत संलग्न यादीनुसार खाते प्रमुख यांना तालुकानिहाय **" पालक अधिकारी "** म्हणून तालुक्याची जबाबदारी देण्यात येत आहे. त्यानुसार पालक अधिकारी म्हणून नियुक्ती दिलेल्या तालुक्यात पंचायत समिती मार्फत योजना राबविणे, ग्रामपंचायत मार्फत राबविल्या जाणार योजनांची १०० % अंमलबजावणी होणेकरिता सनियंत्रण करणे, प्राप्त तक्रारींचा निपटारा करणे, जिल्हा परिषद / पंचायत समिती अंतर्गत संबंधित वर्ग ३ चे कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन जिल्हा परिषदेस सादर करणे, इ. अनुषांगिक कामे करणे आवश्यक आहे. तसेच सोपविण्यात आलेल्या तालुक्यास नियमित भेटी देवून तालुक्या अंतर्गत गावांना स्वत: भेटी देवून मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | पालक अधिकारी म्हणून नेमणुक दिलेला तालुका |
|---|---|---|---|
| १ | श्री.नितीन माने | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) | Washim |
| २ | श्री.प्रमोद कापडे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) | Mangrue Pir |
| ३ | श्री.एस.व्ही.इस्कापे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.) | Malegaon |
| ४ | डॉ.डी.एस.शेलोकार | जिल्हा आरोग्य अधिकारी | Risod |
| ५ | श्री.ए.डी.मानकर | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | Manora |
| ६ | श्री.ए.एम.खान | कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) | Karanja |

**" पालक अधिकारी "** म्हणून जबाबदारी देण्यात आलेल्या तालुक्यास भेट देवून गट विकास अधिकारी / सहायक गट विकास अधिकारी, ग्रामसेवक यांचेशी चर्चा करुन वरिल कामांचा आढावा घ्यावा व कामांच्या प्रगतीबाबतचा अंहवाल माझे समक्ष सादर करावा. सदर बाबतीत विलंब अथवा दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०/०४
**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.जिल्हाधिकारी, वाशिम यांना माहितीस्तव सादर.

**प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव.**

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम
२. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, वाशिम
४. विभाग प्रमुख ----------------------------------------, जिल्हा परिषद, वाशिम
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) जि.वाशिम

१०/०४
**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**

Scanned by CamScanner